नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १८१ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




रविवार, दि. ०७ जून २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### श्रीगोंदा रस्ते आदर्श तालुक्याकडे वाटचाल

श्रीगोंदा तालुका(स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील चिखली-कोरेगाव परिसरातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या सुमारे पाच किलोमीटर लांबीच्या शिव रस्त्याचे यशस्वी सीमांकन करण्यात आले आहे. या सीमांकनामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या वहिवाटीचा मार्ग सुकर होणार असून शेती विकासालाही चालना मिळणार आहे. उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर (श्रीगोंदा-पारनेर), तहसीलदार सचिन डोंगरे (श्रीगोंदा) तसेच भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक अविनाश मिसाळ यांच्या आदेशानुसार आणि शिव पाणंद शेत रस्ते चळवळीचे मार्गदर्शक दादासाहेब जंगले पाटील व गोरख कडूस पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोजणी अधिकारी वासुदेव पाटील यांनी या रस्त्याचे सीमांकन पूर्ण केले.

### विषारी दारुने राज्यात घेतले ४३६ बळी

मुंबई (स. गांवकरी) : विषारी दारु दुर्घटनांना प्रतिबंध करण्यासाठी मिथेनॉलमध्ये रंग आणि कडू चवीचे रसायन मिसळण्याची उत्पादकांना सक्ती करण्यासंदर्भात २०११ मध्ये शासनाने नियम केला. पण रसायन कंपन्यांनी शासनाच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिल्याने त्या नियमाची अंमलबजावणी होवू शकली नाही. परिणामी, रंगीत मिथेनॉलचा विषय ३० वर्षे अंधातरी असून त्यानंतर राज्यात आठ मोठ्या विषारी दारु दुर्घटनांमध्ये ४३६ बळी गेले आहेत. गेल्या आठवड्यात पुण्यातील विषारु दारु दुर्घटनेत २० बळी गेल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने मिथेनॉलच्या बेकायदा विक्रीप्रकरणी छापेमारी सुरु केली. १९९१ मध्ये ताडदेवच्या छाया बार दारु दुर्घटनेमध्ये ९५ बळी गेले होते. त्यानंतर तत्कालीन अतिरिक्त पोलीस महासंचालक पी. आर. पार्थसारथी यांची समिती नेमली. समितीने १९९३ मध्ये १७ शिफारशींचा अहवाल दिला. १०० लिटर मिथेनॉलमध्ये १ ग्रॅम मिथीलीन आणि ४ ग्रॅम डेनाटोनियम मिसळावे, ज्यामुळे मिथेनॉलला रंग आणि कडू चव प्राप्त होईल आणि गावठी दारुमध्ये मिथेनॉल मिसळण्यास चाप बसेल, असा त्यामागे हेतू होता. २००४ मध्ये विक्रोळी दारु दुर्घटनेत १०४ बळी गेले. त्यानंतर पार्थसारथी समितीच्या शिफारशी लागू करण्यासाठी राज्य शासनाने २०११ मध्ये अधिसूचना जारी केली. त्यानुसार मिथेनॉल उत्पादकांना रंग व गंध मिसळण्याची सक्ती केली.

# त्रिभाषा सूत्र गुंडाळले?



> त्रिभाषा धोरणाबाबतचा नरेंद्र जाधव समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. समितीच्या अहवालाबात मुख्यमंत्र्यांचे मार्गदर्शन घेऊन तसेच मंत्रिमंडळात चर्चा करुन निर्णय केला जाईल. पुढील आठवड्यात नवे शैक्षणिक वर्ष सुरु होत असल्याने यंदाचे शैक्षणिक वर्ष सध्याच्या धोरणाप्रमाणेच सुरू राहील.
> **- दादा भुसे, शालेय शिक्षणमंत्री**

मुंबई : (स. गांवकरी)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या आधारे राज्यात शालेयस्तरावर त्रिभाषा सूत्र यंदाच्या शैक्षणिक सत्रापासून लागू होणार नाही, असेच संकेत मिळत आहेत. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत असताना सरकारच्या पातळीवर अद्याप काही निर्णय झालेला नाही. प्रचलित धोरणाप्रमाणेच शैक्षणिक धोरण सुरू राहिल, असे शिक्षणमंत्र्यांनीही स्पष्ट केले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात त्रिभाषा सूत्राचा समावेश आहे. हे धोरण राज्यात लागू करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले होते. गेल्या वर्षी इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्तीचा शासकीय आदेश जारी झाला होता. हिंदी सक्तीला विरोध झाल्यावर फडणवीस सरकारने माघार घेतली. मग नवीन आदेश काढून तिसरी भाषा म्हणून कोणत्याही भारतीय भाषेचा समावेश केला होता. हा हिंदी सक्तीचा डाव असल्याचा आरोप करीत शिवसेना- मनसेने त्याला विरोध केला होता. गेल्या वर्षी महानगरपालिकेची निवडणूक लक्षात घेता हिंदी सक्तीचा विषय वादग्रस्त ठरू शकतो हे लक्षात घेता फडणवीस यांनी त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणीचा शासकीय आदेश रद्द केला होता. त्रित्रीभाषा धोरणाबाबत शिफारस करण्यासाठी राज्य सरकारने शिक्षणतज्ज्ञ आणि अर्थतज्ज्ञ नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आठ सदस्यांची समिती गठीत केली होती. समितीने राज्यातील विविध भागांत जनसंवाद, शिक्षक-पालक बैठका, तज्ज्ञांशी चर्चा आणि ऑनलाइन सूचना संकलन करुन तसेच हजारो नागरिकांची मते विचारात घेऊन अहवाल फेब्रुवारी महिन्यात आपला अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केला होता. त्यावेळी या अहवालावर मंत्रिमंडळात चर्चा करुन पुढील निर्णय घेणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली होती.

नवे शैक्षणिक वर्ष येत्या १५ जूनपासून सुरू होत आहे. त्रिभाषा सूत्र लागू होणार की नाही याबाबत गेली काही दिवस संभ्रम सुरू होता. जाधव समितीच्या अहवालावर सरकार कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले होते.मात्र या गेल्या पाच महिन्यापासून हा अहवाल शिक्षण विभागात कुलूपबंद असून त्याबाबत राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर कोणतीही हालचाल नसल्याची माहिती सूत्रांनी दिली. हा अहवाल अतिशय संवेदनशील असल्याने आणि त्याबाबत मुख्यमंत्र्यांनी अद्याप कोणतेही दिशानिर्देश दिलेले नसल्याने सध्या हा अहवाल कुलूपबंद असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे येत्या शैक्षणिक वर्षापासून त्रिभाषा सूत्राचा निर्णय तुर्तास मागे घेण्यात आल्याचे समजते.

## ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया
### दुसऱ्या फेरीसाठी अर्ज नोंदणी सुरू

वर्धा : (स. गांवकरी)

११वी प्रवेश प्रक्रिया आता वेग घेत आहे. आज ७ जून रोजी एक महत्वाचा निर्णय शिक्षण संचालनालयाने सायंकाळी जाहीर केला आहे. तसेच यात अडचण असल्यास थेट संपर्क करण्याची सुविधा पण देण्यात आली आहे. ही बाब मोठ्या प्रमाणात माहित व्हावी, अशी सूचना पण झाली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील इयत्ता ११ वीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेला वेग आला असून, शिक्षण संचालनालयाने (माध्यमिक व उच्च माध्यमिक) दुसऱ्या नियमित फेरीचे अधिकृत वेळापत्रक जाहीर केले आहे. राज्यातील एकूण ९,५९४ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये ही प्रवेश प्रक्रिया सध्या पूर्ण क्षमतेने राबवली जात आहे. काल, दिनांक ०६ जून २०२६ पासून नियमित दुसऱ्या फेरीसाठीची विद्यार्थी नोंदणी अधिकृतपणे सुरू करण्यात आली आहे. शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी जाहीर प्रकटनाद्वारे दिलेल्या माहितीनुसार, या फेरीमध्ये विद्यार्थ्यांना नवीन नोंदणी करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय, ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वीच नोंदणी केली आहे, त्यांना आपल्या प्रवेश अर्जाच्या भाग-१ मधील चुका दुरुस्त करता येणार आहेत. तसेच, आवडीच्या महाविद्यालयांचे पर्याय निवडण्यासाठीचा 'भाग-२' (कनिष्ठ महाविद्यालय पसंतीक्रम) भरण्याची प्रक्रिया देखील सुरू झाली आहे. ही सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना दिनांक ०९ जून २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजेपर्यंतची अंतिम मुदत देण्यात आली आहे. या फेरीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, शिक्षण संचालनालयाकडून सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज तांत्रिकदृष्ट्या 'अनलॉक' करण्यात आले आहेत. त्यामुळे सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी आपले अर्ज तपासून ते वेळेत 'लॉक' करणे अत्यंत अनिवार्य आहे. अर्ज लॉक न केल्यास संबंधित विद्यार्थी या फेरीच्या पुढील प्रवेश प्रक्रियेपासून वंचित राहू शकतात, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.



**अधिकृत संपर्क माध्यम**
ऑनलाईन प्रवेशाबाबत कोणत्याही अडचणी किंवा तांत्रिक तक्रारी असल्यास विद्यार्थ्यांनी खालील अधिकृत माध्यमांचा वापर करावा:
अधिकृत वेब पोर्टल https://mahafyjcadmissions.in
ई-मेल आयडी: support@mahafyjcadmissions.in
हेल्पलाईन क्रमांक: ८५३०९५५५६४

## बदल्यांमध्ये पारदर्शकता राखल्याबद्दल दिनकर पावरा यांचा सत्कार!





नाशिक : (स. गांवकरी)

आदिवासी विकास विभाग नाशिक अंतर्गत शासकीय आश्रमशाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षक, अधीक्षक, अधीक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, वसतिगृह गृहपाल, कनिष्ठ लिपिक तसेच इतर वर्ग-३ संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या ऑनलाइन बदल्या पारदर्शक पद्धतीने राबविल्याबद्दल अधीक्षक-अधीक्षिका (सास) संघटनेच्या वतीने अपर आयुक्त दिनकर पावरा यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपायुक्त निलेश अहिरे यांचेही संघटनेने मनःपूर्वक आभार मानले. तसेच नाशिक प्रकल्पातील वर्ग-४ संवर्गाच्या बदल्या समुपदेशन व ऑनलाइन पद्धतीने यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी अर्पिता ठुबे यांचाही शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. या प्रसंगी संघटनेचे नाशिक प्रकल्प अध्यक्ष चंद्रशेखर राठोड, उपाध्यक्ष राजश्री बानगुडे, संतोष सोनवणे, संपत माने, राहुल देसले, सागर कन्हेरे, शशिकांत सनांशे, सुधीर करवते, अरुण बागले तसेच प्रकल्पांतर्गत शासकीय आश्रमशाळांतील अधीक्षक व अधीक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अहिल्यानगरमध्ये व्यापाऱ्याची १.५ कोटींची फसवणूक

### शेअर बाजारातील गुंतवणुकीचे आमिष



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शेअर ट्रेडिंगमध्ये पैशांची गुंतवणूक करून मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून अहिल्यानगर शहरातील एका व्यापाऱ्याला तब्बल १ कोटी ४७ लाख ८० हजार रुपयांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार घडला. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार शहराच्या गंजबाजार भागातील व्यावसायिक वल्लभ बिहारीलाल भराडीया यांना एका अनोळखी व्हॉट्सअॅप क्रमांकावरून संपर्क करण्यात आला. जयेश वर्मा असे नाव सांगणाऱ्या व्यक्तीने आपण शेअर बाजार विषयाचे तज्ज्ञ असल्याचे भासवून भराडीया यांचा विश्वास संपादन केला. कमी कालावधीत जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून आरोपीने ४ एप्रिल ते १४ मे २०२६ या कालावधीत वेगवेगळ्या बँक खात्यांवरून एकूण १ कोटी ४७ लाख ८० हजार रुपये भराडिया यांच्याकडून भरून घेतले. काही दिवस उलटूनही कोणताही परतावा न मिळाल्याने आणि मूळ रक्कमही परत न आल्याने आपली फसवणूक झाल्याचे भराडीया यांच्या लक्षात आले . त्यांनी या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी जयेश वर्मा या संशयित आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सागर ढिकले करत आहेत. नागरिकांनी अनोळखी व्यक्तींच्या आर्थिक आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन पोलिस वारंवार करत असले तरी नागरिक लोभामुळे ऑनलाइन फसवणुकीला मोठ्या प्रमाणावर बळी पडत आहेत. यापूर्वी एखादी लिंक पाठवून त्याद्वारे पैसे काढून घेतले जात होते. नंतर गुन्ह्याच्या पद्धतीत बदल करत फसवणूक करणाऱ्यांनी गुंतवणुकीचे आमिष दाखवत गुन्हे करण्यास सुरुवात केली. अलीकडच्या काळात शेअर बाजारातील गुंतवणुकीवर मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत फसवणूक करण्याचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः सुशिक्षित व व्यापारी या फसवणुकीला मोठ्या प्रमाणावर बळी पडत आहेत. संपर्क करणारी व्यक्ती अनोळखी असूनही नागरिक त्याच्या आमिषाला बळी पडत आहेत. काही महिन्यांपूर्वी एका प्राध्यापकाला अशाच पद्धतीने १ कोटी रुपयांना गंडा घालण्यात आल्याचा गुन्हा सायबर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. फसवणुकीचे गुन्हे दाखल होत आहेत, मात्र आरोपी पकडले जात नाहीत. त्यामुळे आरोपी गुन्ह्याच्या वेगवेगळ्या पद्धती अवलंबून फसवणूक करत आहेत. सायबर पोलिसांनी जनजागृतीसाठी मोहीम सुरू करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

## माजी आमदार वैभव नाईक यांच्या मालमत्तेची 'एसीबी'कडून पुन्हा चौकशी सुरू



■ कणकवली नगरपंचायतीकडे गाळ्यांबाबत मागितली सविस्तर माहिती

### कोणाच्याही दबावाला बळी पडणार नाही : वैभव नाईक

या संपूर्ण प्रकरणावर माजी आमदार वैभव नाईक यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ते म्हणाले की, "गेल्या पाच वर्षांपासून माझी सातत्याने चौकशी सुरू आहे. आम्ही या चौकशीला पूर्णपणे सामोरे जात आहोत आणि पुढेही जाऊ. मात्र, केवळ राजकीय हेतूने एखाद्या व्यक्तीची पाच-पाच वर्षे पुन्हा पुन्हा चौकशी करून दबाव आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. मी अशा कोणत्याही दबावाला अजिबात बळी पडणार नाही. चौकशी यंत्रणेला आवश्यक ते सहकार्य केले जाईल.अन्य काही चौकश्या थांबल्या आहेत. मग माझ्याच मागे कशाला चौकशी चा ससेमीरा सुरू आहे"

सावंतवाडी : (स. गांवकरी)

ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आणि माजी आमदार वैभव नाईक यांच्या बेहिशेबी मालमत्तेच्या चौकशीसंदर्भात पुन्हा एकदा वेगाने हालचाली सुरू झाल्याचे समोर आले आहे. रत्नागिरी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) कणकवली नगरपंचायतीकडे एक पत्र पाठवून वैभव नाईक यांनी खरेदी केलेल्या व्यापारी गाळ्यांबाबत सविस्तर माहिती मागविली आहे. 'एसीबी'च्या या पावलामुळे राजकीय वर्तुळात आणि जिल्ह्यात या प्रकरणाची पुन्हा एकदा जोरदार चर्चा रंगली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कणकवली शहरामध्ये वैभव नाईक यांनी खरेदी केलेल्या मालमत्तेबाबत 'एसीबी'कडून सध्या सखोल पडताळणी सुरू आहे. संबंधित मालमत्तेमध्ये गाळा नेमका एक आहे की दोन, याबाबत स्पष्ट आणि सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश नगरपंचायतीला देण्यात आले आहेत. या संदर्भातील अधिकृत पत्र रत्नागिरी एसीबीच्या पोलीस उपअधीक्षकांकडून कणकवली नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांना पाठविण्यात आले असल्याचे समजते. संबंधित गाळ्यांची खरेदी सन २००२ आणि २००६ या कालावधीत करण्यात आली होती. दरम्यान, २०२२ पासून वैभव नाईक यांच्या कथित बेहिशेबी संपत्ती प्रकरणी रत्नागिरी एसीबीमार्फत चौकशी सुरू आहे. आता पुन्हा एकदा या जुन्या मालमत्तांची कागदपत्रे आणि तपशील तपासले जात असल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता आहे.



# थोडक्यात पण महत्वाचे




## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नंदिनी नदी स्वच्छता अभियान उत्साहात संपन्न

नाशिक (स. गांवकरी) : मा. कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांच्या सुंदर नाशिक अभियानांतर्गत जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नाशिक शहरात नंदिनी नदी स्वच्छता अभियान उत्साहात संपन्न झाले. या अभियानामध्ये जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या अनुयायांनी हजारोंच्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रतिमेचे पूजन मा. कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. मुंबई नाका ते नासर्डी पूल परिसरादरम्यान वाहणाऱ्या नंदिनी नदीची स्वच्छता करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या अभियानात सेवेकरी, शिष्य, साधक, युवा कार्यकर्ते तसेच पर्यावरणप्रेमी नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या प्रसंगी नाशिकच्या महापौर हेमगौरीताई आडके, उपमहापौर विलास शिंदे, प्रभाग सभापती मंगला प्रकाश ननावरे, गटनेते शाम बडोदे,नगरसेविका रुपाली यशवंत निकुळे, नगरसेवक चंद्रकांत खोडे,माजी नगरसेवक यशवंत निकुळे,सुनील खोडे,प्रकाश ननावरे,सरचिटणीस सुनील देसाई,मंडळ अध्यक्ष उदय जोशी,बापू यशोद, गणपत वारडे,सचिन ननावरे,सुनील निकम,संकेत खोडे,निखिल खोडे,स्वाती वाटारे,सोनाली कुलकर्णी तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## विशेष सायकल राईड उत्साहात संपन्न; चैतन्य फार्म येथे वृक्षारोपण

नाशिक (स. गांवकरी) : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासन वन्यजीव विभाग, नाशिक, नाशिक सायक्लिस्ट फाउंडेशन (NCF) आणि चैतन्य फार्म यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दिनांक ५ जून २०२६ रोजी नाशिक शहरात 'विशेष सायकल राईड'चे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले होते. "एक झाड लावूया... सायकल चालवूया... पर्यावरण वाचवूया!" हा पर्यावरण संवर्धनाचा बहुमूल्य संदेश जनमानसात पोहोचवण्याच्या उद्देशाने या राईडचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष सायकल राईडची सुरुवात सकाळी ६:३० वाजता उपवनसंरक्षक वन्यजीव नाशिक यांचे कार्यालय (आदिवासी भवन समोर, गडकरी चौक, नाशिक) येथून झाली. या प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून श्री. हेमंत उबाळे (सहायक वनसंरक्षक, नांदुरमध्यमेश्वर अभयारण्य) आणि श्री. हिरालाल चौधरी (वनपरिक्षेत्र अधिकारी, नांदुरमध्यमेश्वर अभयारण्य) हे मान्यवर उपस्थित होते. त्यांनी सायकल चालकांना हिरवा झेंडा दाखवून राईडचा (फ्लॅग ऑफ) शुभारंभ केला. सदर सायकल राईड मुख्य वन संरक्षक कार्यालय गडकरी चौक येथून निघून , मायको सर्कल, एबीबी सर्कल, जेहँगिर सर्कल, सोमेश्वर, गंगापूर गाव मार्गे जात 'चैतन्य फार्म' येथे पोहोचली. संपूर्ण राईड दरम्यान सायकलस्वारांनी पर्यावरण रक्षणाचे फलक हातात धरून नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. राईडच्या सांगतेनंतर 'चैतन्य फार्म' येथे सर्व सहभागी सायकलपटूंच्या हस्ते ‘एक पेड माँ के नाम‘ अंतर्गत भव्य वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. केवळ सायकल चालवणे नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्याचा संदेश यातून देण्यात आला. राईडनंतर सर्व सहभागींसाठी श्री. दीपक भोसले यांच्या वतीने अल्पोपहाराची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. नाशिक सायक्लिस्ट फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. अमित नारायण घुगे यांनी हेमंत उबाळे, हिरालाल चौधरी , सर्व सायकलस्वार मित्र, पर्यावरणप्रेमी आणि नाशिकच्या नागरिकांचे मोठ्या संख्येने सहभागी झाल्याबद्दल आभार मानले. ते म्हणाले, "हरित प्रवास, निरोगी जीवन आणि स्वच्छ पर्यावरण ही आजच्या काळाची गरज आहे. नाशिककरांनी आजच्या जागतिक पर्यावरण दिनाला प्रत्यक्ष कृतीची (वृक्षारोपणाची) जोड देऊन हा दिवस खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण बनवला आहे."

## हेमंत डुंबरे यांची जुन्नर तालुकाध्यक्ष पदी सलग चौथ्यांदा निवड



ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील हेमंत वसंतराव पाटील डुंबरे यांची राष्ट्रीय मानवाधिकार सुरक्षा संघ, जुन्नर तालुकाध्यक्षपदी सलग चौथ्यांदा निवड झाली आहे. डुंबरे यांनी आपल्या वडिलांकडून समाजसेवेचा वारसा जपत मागील अनेक वर्षापासून विविध सामाजिक उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या सातत्यपूर्ण समाजकार्याची दखल घेत ही निवड झाली असल्याचे यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. राष्ट्रीय मानवाधिकार ही एक स्वतंत्र वैधानिक संस्था आहे. मानवाधिकार संरक्षण कायदा, १९९३ अंतर्गत नागरिकांच्या जीवन, स्वातंत्र्य, समानता आणि प्रतिष्ठेचे रक्षण करणे हे या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. शासकीय अधिकाऱ्यांकडून मानवी हक्कांचे हनन झाल्यास पीडित व्यक्ती, तिचे नातेवाईक किंवा सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडे तक्रार करू शकतात. डुंबरे यांनी सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रभावीपणे काम केले असून, त्यांच्या कार्यपद्धतीमुळे नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल विश्वास निर्माण झाला आहे. यापूर्वीही तीन वेळा त्यांनी हे पद यशस्वीरित्या भूषविले असून यावेळी चौथ्यांदा त्यांना पुन्हा संधी मिळाल्याने कार्यकर्त्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.



०५/०६/२६ रोजी जागतिक पर्यावरण दिन निमित्त जनरल वैद्य नगर येथील मध्यवर्ती मैदान येथे वृक्षरोपणाचा कार्यक्रम करण्यात आला त्यावेळी प्रभाग १५ चे नगरसेवक प्रथमेश भाऊ गीते व नगरसेविका सीमा ताई पवार तसेच,अमित चार्वेकर,सुरज वनमाळी, मंगेश चार्वेकर,श्रीजय झाबरें, मनिष कोरानें, प्रसाद गवळी, व परिसरातील ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# गोदावरी महामंडळ कार्यालय स्थलांतराचा विखेंचा ‘बालहट्ट’

- निर्णय मागे घेतला नाही तर संघर्ष अटळ
- खासदार नीलेश लंके यांचा पत्रकार परिषदेत इशारा
- शासनाची मंजुरी नसताना कार्यालये हलविण्याचा निर्णय
- दक्षिण नगरच्या सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्र येण्याचे आवाहन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारीतील महत्त्वाच्या विभागीय कार्यालयांचे अहिल्यानगरमधून लोणी येथे स्थलांतर करण्याचा निर्णय हा शासनाची कोणतीही पूर्वमान्यता न घेता घेतलेला असून तो पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा ‘बालहट्ट’ असल्याची घणाघाती टीका खासदार नीलेश लंके यांनी केली. हा निर्णय तातडीने मागे घेण्यात आला नाही तर शेतकरी, कर्मचारी आणि नागरिकांच्या सहभागातून व्यापक लोकआंदोलन उभारले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. अहिल्यानगर येथे शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना खासदार लंके यांनी गोदावरी खोरे महामंडळाच्या कार्यालय स्थलांतराच्या प्रस्तावावर तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी नगरसेवक योगीराज गाडे, अशोक बाबर आदी उपस्थित होते. कार्यालय स्थलांतरामागे वेगळाच हेतू असल्याची शंका उपस्थित करताना लंके म्हणाले, की कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर पाटबंधारे विभाग आणि मुळा पाटबंधारे विभागाची कार्यालये लोणी येथे हलविण्याचा घाट घातला जात आहे. जलसंपदा विभागांतर्गत कार्यरत असलेल्या गोदावरी व कृष्णा सिंचन विकास महामंडळांचा कारभार पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आहे. सिंचन प्रकल्पांची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या या महामंडळांवर शासनाचे नियंत्रण असताना शासनाला विश्वासात न घेता स्थलांतराचा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. ते म्हणाले, ज्या ठिकाणी कार्यालये हलविण्याचा प्रस्ताव आहे, तेथे स्वतंत्र प्रशासकीय इमारत नाही, कर्मचाऱ्यांसाठी निवास व्यवस्था नाही आणि आवश्यक पायाभूत सुविधांचाही अभाव आहे. अशा परिस्थितीत हा निर्णय कर्मचाऱ्यांच्या किंवा शेतकऱ्यांच्या हिताचा नसून त्यामागे काही वेगळाच हेतू असल्याची शंका निर्माण होते. श्रीरामपूरमध्ये जसे काही प्रकार घडले, त्याच धर्तीवर या जागा एखाद्या खाजगी संस्थेला देण्याचा डाव तर नाही ना, असा प्रश्न निर्माण होत आहे. या संपूर्ण प्रकरणाची

> अहिल्यानगर पाटबंधारे विभागाचे कार्यालय १९३० पासून जिल्हा मुख्यालयात कार्यरत आहे, तर मुळा पाटबंधारे विभागाचे कार्यालय १९५२ पासून येथेच कार्यरत आहे. या कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात अकोले, संगमनेर, राहाता, राहुरी, नेवासा, शेवगाव, पाथर्डी आणि पारनेर या तालुक्यांचा समावेश आहे. त्यामुळे शेतकरी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी जिल्हा मुख्यालयातील ही कार्यालये अधिक सोयीची असल्याचे त्यांनी नमूद केले.

> वैद्यकीय महाविद्यालयाच्या मुद्द्यावरूनही त्यांनी पालकमंत्री विखे पाटील यांच्यावर निशाणा साधला. नगरसाठी मंजूर झालेले वैद्यकीय महाविद्यालय अन्यत्र वळविण्याचा प्रयत्न झाला होता, मात्र केंद्रीय समितीसमोर ठाम भूमिका मांडल्यामुळे ते नगरमध्येच राहिले, असा दावा त्यांनी केला.

माहिती राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे दिली असून शासनाने तातडीने हस्तक्षेप करून स्थलांतर प्रक्रिया थांबवावी, अशी मागणी आपण केली असल्याचे लंके यांनी सांगितले. निर्णय कायम ठेवण्याचा प्रयत्न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र संघर्ष उभारला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. कोणतीही लोकमागणी नसताना तब्बल नऊ दशकांची प्रशासकीय परंपरा असलेली कार्यालये हलविण्याचा हट्ट का धरला जात आहे? असा सवाल उपस्थित करत त्यांनी सांगितले की, स्थलांतरामुळे नागरिकांना अतिरिक्त प्रवास करावा लागेल, वेळ आणि पैशांचा अपव्यय होईल तसेच शेतकऱ्यांच्या कामांमध्ये अडथळे निर्माण होतील. यापुढेही अशाच प्रकारे शासकीय कार्यालये हलविण्याचे प्रयत्न होऊ शकतात, अशी भीती व्यक्त करताना लंके म्हणाले, आज पाटबंधारे विभागाची कार्यालये हलविली जात आहेत. उद्या जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद किंवा इतर महत्त्वाची शासकीय कार्यालयेही स्थलांतरित करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन याला विरोध करणे आवश्यक आहे.जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक प्रश्न प्रलंबित असताना विकासकामांऐवजी कार्यालयांचे स्थलांतर करण्यावर भर दिला जात असल्याची टीका करताना त्यांनी जिल्ह्यातील विकासाच्या असमतोलावरही प्रश्न उपस्थित केले.

## प्रतीक्षाधीन यादीतील दुसऱ्या फेरीस प्रारंभ

ठाणे : (स. गांवकरी)

शिक्षण हक्क कायदा (RTE) २००९ अंतर्गत खासगी विनाअनुदानित शाळांमधील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ साठी प्रतीक्षाधीन यादीतील (Waiting List) दुसऱ्या फेरीस दि. ०४ जून, २०२६ ते १२ जून, २०२६ पर्यंत कालावधी देण्यात आला आहे. राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या निर्देशानुसार आणि शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. पहिल्या फेरीतील प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रतीक्षाधीन यादीतील पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी दुसरी फेरी सुरू करण्यात आली आहे. या फेरीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी आरटीई प्रवेश पोर्टलवर उपलब्ध माहितीनुसार निश्चित कालावधीत संबंधित शाळेत आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी. मुदतीत प्रवेश निश्चित न केल्यास संबंधित जागा पुढील पात्र विद्यार्थ्यास उपलब्ध करून दिली जाईल. पालकांनी प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे, निवासाचा पुरावा, जन्मनोंद प्रमाणपत्र, आधार कार्ड तसेच शासनाने निर्देशित केलेली इतर कागदपत्रे तयार ठेवावीत. प्रवेश प्रक्रियेदरम्यान कोणतीही अडचण आल्यास संबंधित गटशिक्षणाधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग अथवा आरटीई हेल्पडेस्कशी संपर्क साधावा. आरटीई अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा उद्देश असून, पात्र पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिक्षण विभागामार्फत करण्यात आले आहे.

## रेणावीकर विद्यालयाचे दुहेरी यश, गुणवंतांचा सत्कार संपन्न

### विद्यालयाची विद्यार्थिनी संपूर्ण जिल्ह्यात प्रथम तर संस्कृतमध्ये १०० पैकी १०० मार्क्स असणाऱ्या ५ विद्यार्थी

अहिल्यानगर: (स. गांवकरी)

सावेडीतील रेणावीकर माध्यमिक विद्यालयाने माध्यमिक शालांत परीक्षा मार्च २०२६ मध्ये यंदा दुहेरी यश संपादन केले आहे. अहिल्यानगर मधील नामांकित प्रशाला रेणावीकर माध्यमिक विद्यालयाने यावर्षीच्या निकालात नेहमीचीच परंपरा कायम राखत उत्कृष्ट यश संपादन केले.

विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी गौरी मुकेश साठे ही तब्बल ५०० पैकी ४९८ गुण संपादन करून जिल्ह्यात प्रथम स्थानावर आली आहे. विद्यालयाच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा विशेष करून ९०% पेक्षा जास्त गुण संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा काल विद्यालयात शाळा समितीचे अध्यक्ष डॉक्टर राजीव हाजीरनीस यांच्या हस्ते संपन्न झाला.याप्रसंगी विद्यालयात सत्कारमूर्ती विद्यार्थी विद्यार्थिनी, त्यांचे पालक,सर्व अध्यापक त्याचप्रमाणे प्रशालेचे



मुख्याध्यापक श्री. राजेंद्र कांबळे, नूतन मुख्याध्यापक श्री चंदू गवळी,शाला समितीचे महामात्र डॉक्टर उमेश बिबवे,सदस्य श्री पिंपळे सर व विद्यार्थी उपस्थित होते. कुमारी गौरी मुकेश साठे ९९.६० प्रथम क्रमांक,चिरंजीव राघव शिरीष व्हरसाळे ९८.८० द्वितीय क्रमांक तर सिद्धा आशिष चाकवते ९६.६० गुण प्राप्त करून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. विद्यालयातील ५ विद्यार्थ्यांना संस्कृत मध्ये १०० पैकी १०० गुण प्राप्त झाले आहेत. याप्रसंगी डॉक्टर हजिरनीस सर यांनी विद्यार्थ्यांना करिअर घडवताना वेळोवेळी SWOT तंत्राचा वापर करण्याचा मुलाचा सल्ला दिला. कुमारी गौरी साठे या विद्यार्थिनींनी विद्यालयाचे नाव शहराच्या शैक्षणिक इतिहासात उंचावले यासाठी तिचे विशेष कौतुक करून तिला रोख बक्षीस प्रदान करून शाब्बासकी दिली. यंदाच्या वर्षी विद्यालयाची विद्यार्थिनी संपूर्ण जिल्ह्यात प्रथम आली आहे तसेच संस्कृत मध्ये १०० पैकी १०० मार्क्स असणाऱ्या पाच विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे आहेत कुमारी नम्रता घोलप, कुमारी ज्ञानेश्वरी बारस्कर , कुमारी गौरी ढवण, चिरंजीव राघव व्हरसाळे, कुमारी सिद्धा चाकवते तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ स्नेहल उपाध्ये यांनी केले तर उपस्थितांचे आभार श्री शैलेश बोरुडे सर यांनी मानले.

## देगलूर-बिलोली मतदारसंघातील शेतकऱ्यांना मंजूर पीकविमा तत्काळ द्या; आ.अंतापूरकरांची मुख्यमंत्र्याकडे मागणी

बिलोली : (स. गांवकरी)

देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित महसूल मंडळांमधील शेतकऱ्यांना मंजूर झालेली पीकविम्याची रक्कम अद्याप मिळालेली नाही. खरीप हंगाम तोंडावर आला असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही बाब लक्षात घेऊन आमदार जितेश अंतापूरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन मतदारसंघातील शेतकऱ्यांना मंजूर पीकविमा रक्कम तत्काळ वाटप करण्याची आग्रही मागणी केली आहे. या संदर्भातील सविस्तर मागणीचे निवेदन त्यांनी मुख्यमंत्र्यांना सुपूर्द केले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, देगलूर तालुक्यातील एकूण सात महसूल मंडळांपैकी केवळ चार महसूल मंडळांमध्येच आतापर्यंत पीकविम्याची रक्कम वितरित करण्यात आली आहे. मात्र, तालुक्यातील *देगलूर, खानापूर आणि मरखेल* या महत्त्वाच्या विभागांतील शेतकरी अद्यापही या लाभापासून पूर्णपणे वंचित आहेत. याचप्रमाणे, बिलोली तालुक्यातील बिलोली व कुंडलवाडी या महसूल मंडळांतील शेतकऱ्यांनाही मंजूर झालेली पीकविमा रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे या भागातील शेतकरी वर्गामध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. सध्या खरीप हंगाम अगदी तोंडावर आला आहे. नवीन पिकांच्या पेरणीसाठी शेतकऱ्यांना बियाणे, खते, शेतीची औषधे आणि इतर आवश्यक वस्तूंची खरेदी करावी लागत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांकडे भांडवल उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे. जर प्रलंबित असलेली पीकविम्याची रक्कम शासनाकडून तत्काळ वितरित झाली, तर या आर्थिक संकटामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळेल आणि त्यांची खरीप हंगामाची पूर्वतयारी सुलभ होईल, असा विश्वास आमदार अंतापूरकर यांनी यावेळी व्यक्त केला. आमदार जितेश अंतापूरकर यांनी मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधताना सांगितले की, विमा मंजूर होऊनही तो शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा न झाल्याने शेतकरी अडचणीत आला आहे. त्यामुळे संबंधित विभागाने या प्रकरणात त्वरित लक्ष घालावे आणि आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करून पीकविमा वाटप लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी त्यांनी केली. या भेटीदरम्यान मुख्यमंत्र्यांनीही या विषयावर सकारात्मक चर्चा करून योग्य ती पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे.

## शोभा शेलार यांची जिल्हा परिषद ठाणे येथे नियुक्ती

ठाणे : (स. गांवकरी)

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या शासन आदेशानुसार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई शहर या पदावर कार्यरत असलेल्या शोभा म. शेलार यांची जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद ठाणे या पदावर बदली करण्यात आली असून त्यांनी आज, दि. १ जून, २०२६ रोजी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. शासनाच्या निर्देशानुसार शेलार यांनी जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद ठाणे या पदावर रुजू होताना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई शहर या पदाचा अतिरिक्त कार्यभारही स्वीकारला आहे. महिला व बाल विकास क्षेत्रातील विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीचा समृद्ध अनुभव असलेल्या श्रीमती शेलार यांनी यापूर्वी विविध पदांवर कार्यरत असताना महिला सक्षमीकरण, बाल संरक्षण, पोषण अभियान, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, अंगणवाडी सेवा तसेच विविध शासकीय कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीत उल्लेखनीय योगदान दिले आहे.त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या अंमलबजावणीस अधिक गती मिळण्यास मदत होणार आहे. विशेषतः महिला व बालकांच्या आरोग्य, पोषण, शिक्षण, संरक्षण आणि सर्वांगीण विकासाशी संबंधित उपक्रम अधिक परिणामकारकपणे राबविण्यासाठी त्यांच्या अनुभवाचा लाभ होणार आहे.




# कर्जमाफीत शेतकऱ्यांची फसवणूक; आदेशाची होळी

पारनेर : (स. गांवकरी)

कर्जमाफीसाठी सरकारने काढलेल्या शासन आदेशामध्ये अत्यंत जाचक अटी शर्ती लागू करण्यात आल्या असून त्या तातडीने रद्द झाल्या पाहिजे. यावेळची कर्जमाफी आजपर्यंतच्या सर्व कर्जमाफीमध्ये सर्वात कडक अटी शर्ती असलेली व खूप कमी शेतकऱ्यांना लाभ देणारी ठरणार आहे. त्यासाठी सरकारने सरसकट कर्जमाफी केली पाहिजे अशा मागण्या करत कर्जमाफीसाठी सरकारने काढलेल्या शासन निर्णयाच्या विरोधात भूमिपूत्र शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. पारनेर तालुक्यातील देसवडे येथे भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकऱ्यांनी एकत्र येत कर्जमाफी आदेशाची होळी करत आंदोलन केले. यावेळी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.



तसेच शेतकऱ्यांच्या या फसवणुकी विरोधात शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप असून तो राज्यभर आंदोलनाच्या माध्यमातून व्यक्त होत असल्याचा दावा यावेळी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांनी केला आहे. त्यामुळे आता फडणवीस सरकारच्या विरोधात शेतकरी संघटना आक्रमक होणार असल्याचे चित्र दिसत आहे.

कर्जमाफीसाठी लावण्यात आलेल्या अटी रद्द करा तसेच सर्व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, अशी किसान सभेची मागणी आहे. सरकारने कर्जमाफी करताना, २०१९ मध्ये कर्जमाफी घेतलेले शेतकरी, जरी ते यावेळी थकित असले तरी त्यांना केवळ ५० हजार रुपयांच्या मर्यादेत कर्जमाफी देण्यात येणार आहे. नियमित कर्जदारांना सुद्धा केवळ ५० हजार रुपये देण्यात येणार आहे. त्यांनाही किमान दोन वर्ष नियमित कर्जदार असणे ही अट टाकण्यात आली आहे. अत्यल्प पगारावर राबणाऱ्या सहकार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना कर्जमाफीतून वगळण्यात आले आहे. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन द्यायचे आणि आता २ लाख कर्ज माफ करणार सांगून बहुसंख्य शेतकऱ्यांची केवळ ५० हजारावर बोळवणूक करायची ही अत्यंत संतापजनक गोष्ट असून ही शेतकऱ्यांची घोर फसवणूक असल्याची टीका भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांनी यावेळी बोलताना केली.

कर्जमाफीसाठी लावलेल्या अटी रद्द करा. सर्व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या. नियमित कर्जदार शेतकरी, शेड नेट, पॉली हाऊस शेतकरी, कुक्कुट पालन शेतकरी यांच्यासह सर्व पीक व शेती सुधारणा कर्ज माफ करा आदी मागण्या करण्यात आल्या. या आंदोलनावेळी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर, सरपंच पोपट दरेकर, चेअरमन संतोष टेकुडे, विशाल वाडेकर, ठमाजी भोर, रावसाहेब फटांगरे, काशिनाथ गोळे,मंजाबापू वाडेकर,पंडित गागरे सर, साहेबराव भोर, शंकर भोर, अजित वाडेकर, राहुल पारधी, देविदास टेकुडे, किरण फटांगरे, तेजस फटांगरे, हर्षद वाडेकर, गणेश फटांगरे, बाळासाहेब वाडेकर, पप्पू वाडेकर, भाऊसाहेब दरेकर, एकनाथ फटांगरे, नवनाथ जाधव, सुरेश दरेकर, सचिन खाडे, साहेबराव वाडेकर, उपसरपंच सचिन भोर, शांताराम भोर, बाबासाहेब वाडेकर, पोपट फटांगरे, शंकर टेकुडे, दत्ता फटांगरे, बबन भोर, सचिन घेमूड यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अहिल्यानगर विधानपरिषद प्राजक्त तनपुरे बिनविरोध

## आमदार जगताप यांची शिष्टाई

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

उमेदवारी अर्ज माघारीवरून घेण्यात आलेला आक्षेप गैरसमजूतीतून घेण्यात आल्याबाबतचे लेखी पत्र अपक्ष उमेदवार दत्तात्रय पानसरे यांनी जिल्हाधिकार्‍यांना दिल्यानंतर भाजपचे उमेदवार प्राजक्त तनपुरे यांचा बिनविरोध निवडून येणार्याचा मार्ग मोकळा झाला असून रात्री उशीरापर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री राधाकृष्ण विखे, प्राजक्त तनपुरे यांसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. मात्र जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकार्‍यांकडून याबाबत अधिकृत निर्णय जाहीर झाला नव्हता. अपक्ष उमेदवार दत्तात्रय पानसरे यांचा उमेदवारी अर्ज सूचक शेहबाज खालिद शेख यांच्या माध्यमातून मागे घेण्यात आला होता. त्याला पानसरे यांनी आक्षेप घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयात आत्मदहनाचा इशारा दिला होता. त्याबरोबर पणन महासंघाच्या अध्यक्षपदाचा देखील त्यांनी राजीनामा दिला होता. यावरून जिल्हाधिकारी कार्यालयात दुपारी ३.१० मिनिटांनी सुरू झालेला गोंधळ रात्री साडेआठ वाजेपर्यंत चालू होता. पानसरे यांची प्रथम प्राजक्त तनपुरे यांनी समजूत काढली. तासभर चर्चा करून देखील पानसरे यांचे समाधान झाले नाही. अखेर आमदार संग्राम जगताप यांनी पानसरे यांच्याबरोबर चर्चा केली. आ. जगताप यांनी पानसरे यांची पालकमंत्री विखे यांच्याबरोबर देखील चर्चा घडवून आणली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी देखील चर्चा घडवून आणली. त्यावेळी पानसरे यांनी पणन महासंघात भाजपच्या आमदारांकडून होणार हस्तक्षेप तसेच पणन महासंघाची सुरू असलेल्या चौकशीबाबत मुख्यमंत्र्यांकडे दाद मागितली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी याबाबत योग्य तो निर्णय घेऊन पाच वर्ष महासंघाचे अध्यक्षपद पानसरे यांच्याकडे राहणार असल्याचे आश्वासन दिल्यानंतर पानसरे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची भूमिका घेतली. दरम्यान, पानसरे यांनी जिल्हाधिकार्यांना यापूर्वी दिलेल्या पत्रावरून पुन्हा लेखी पत्र दिले की गैरसमजूतीतून उमेदवारी अर्ज माघारी घेण्याबाबत आक्षेप घेतला होता. सूचकाने दिलेला उमेदवारी अर्ज माघारीच्या पत्रावर माझी स्वाक्षरी असल्याचे मान्य केले. त्यामुळे पानसरे यांचा उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे भाजपचे उमेदवार प्राजक्त तनपुरे हे बिनविरोध निवडून आले. यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, प्राजक्त तनपुरे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.प्राजक्त तनपुरे यांचे माघारी घेण्यासाठी विनंती करणे कामच होते, पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सर्व नेत्यांच्या आग्रहानंतर मी माघार घेतल्याचे दत्तात्रय पानसरे म्हणाले. प्राजक्त तनपुरे यांना एकच विनंती आहे की आमच्या नगरसेवकांची काम करा, त्यांना न्याय द्या.



# जामखेड उपनगराध्यक्षांचे नगरसेवकपद धोक्यात?

- जातप्रमाणपत्र प्रकरणी अंतिम युक्तिवाद पूर्ण, निर्णय राखीव
- जामखेड शहरामधे राजकीय क्षेत्रात वादळा पुर्वीची शांतता
- राजकीय क्षेत्रात उलथा पालथ होण्याची शक्यता?
- भाजप पक्षाला प्रथमच नगर पालिकेत सता मिळाली आहे. त्यातच हा मोठा धक्का बसतो की काय?

जामखेड तालुका : (स. गांवकरी)



जामखेड नगरपरिषद निवडणुकीतील वॉर्ड क्र. ३ मधील ओबीसी प्रवर्गातून निवडून आलेले उपनगराध्यक्ष यांच्या जातप्रमाणपत्राच्या वैधतेची कायदेशीर लढाई आता अंतिम टप्प्यात आली आहे. या प्रकरणी सदर प्रभागातील पराभूत उमेदवार ऋषिकेश विष्णू खरात यांनी दाखल केलेल्या तक्रारीवर अहिल्यानगर येथील जातपडताळणी समितीसमोर अंतिम युक्तिवाद पूर्ण झाला असून, समितीने हा निर्णय राखीव ठेवला आहे. त्यामुळे उपनगराध्यक्षांचे नगरसेवकपद राहणार की जाणार, याची उत्सुकता जामखेडवासियांमध्ये निर्माण झाली आहे. जामखेड नगरपरिषद निवडणुकीत वॉर्ड क्र. ३ मधून ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढवून उपनगराध्यक्ष विजयी झाले होते. मात्र, त्यांनी निवडणूक लढवताना सादर केलेले जातप्रमाणपत्र चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे मिळवल्याचा गंभीर आरोप करत पराभूत उमेदवार ऋषिकेश खरात यांनी २९ जानेवारी २०२६ रोजी जातपडताळणी समिती व जिल्हाधिकाऱ्यांकडे याविरोधात अधिकृत तक्रार दाखल केली होती.

तक्रारदाराने दाखल केलेल्या दाव्यानुसार उपनगराध्यक्ष यांनी नगर परिषदेच्या उमेदवारीसाठी दाखल केलेले जातप्रमाणपत्र काढताना २९ जुलै १९१८ रोजीचा शिऊर गावचा 'गाव नमुना १४' जोडण्यात आला आहे, जो पूर्णपणे बनावट स्वरूपाचा आहे.या गाव नमुन्यात उल्लेख असलेल्या व्यक्तीचा आणि उपनगराध्यक्षांच्या वंशावळीचा कोणताही संबंध नाही. उपनगराध्यक्षांची सर्व मूळ कागदपत्रे ही 'मराठा' जातीची असून, त्यांनी केवळ नावातील साधर्म्याचा (साम्य) गैरवापर करून हे ओबीसी प्रमाणपत्र मिळवले आहे.उपनगराध्यक्षांनी हा पुरावा आपल्या आजोळचा असल्याचा दावा केला होता, मात्र तक्रारदाराने तहसील कार्यालय आणि संबंधित गावात चौकशी केली असता, तिथं आजोळचा कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. या प्रकरणाची सुनावणी अहिल्यानगर येथील जातपडताळणी समितीसमोर सुरू होती. गेल्या काही महिन्यांत १२ मे, १९ मे व २६ मे २०२६ आणि २ जून २०२६ रोजी यावर सविस्तर सुनावणी झाली. (नोंद: तारखांमधील प्रशासकीय नोंदीनुसार) अखेर काल, ४ जून २०२६ रोजी या प्रकरणावर दोन्ही बाजूंचा अंतिम युक्तिवाद पार पडला. समितीने आता या प्रकरणाचा निकाल राखून ठेवला आहे. जातपडताळणी समितीचा हा आगामी निर्णय जामखेडच्या स्थानिक राजकारणाला कोणती कलाटणी देणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# भाजपचे "एक पेड माँ के नाम" या संकल्पनेतून वृक्षारोपण



ठाणे : (स. गांवकरी)

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी दिवा शील मंडळ "एक पेड माँ के नाम" या संकल्पनेतून वृक्षारोपणलाच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणादायी "एक पेड माँ के नाम" या संकल्पनेतून वृक्षारोपण करण्यात आले. आई जसे आपल्या लेकरांचे संगोपन करते, त्याचप्रमाणे वृक्षही मानवजातीचे संरक्षण करत जीवनाला आधार देतात. आई प्रती कृतज्ञता व्यक्त करताना पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही पार पाडण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आणि ठाणे जिल्हा अध्यक्ष संदीप लेले ह्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षामार्फत राज्यभर राबविण्यात येत असलेल्या वृक्षारोपण अभियानात सहभागी होत आम्ही पर्यावरण संरक्षणाचा संकल्प दृढ केला.

# संपर्क प्रमुखपदी पत्रकार अनिल पाटील धमने यांची निवड

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ भाई शिंदे यांच्या आदेशानुसार व शिवसेनेचे मुख्य सचिव संजय मोरे, खा .डॉ . श्रीकांत शिंदे, प्रशांत पालांडे, यांच्या मागदर्शनाखाली ओबीसी नेते तथा शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे प्रदेश अध्यक्ष ॲड. डॉ पी बी कुंभार यांच्या नेत्तृत्वाखाली व यांच्या सही निशी दि ६/६ / २०२६ रोजी शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाच्या महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख पदी अनिल पाटील धमने यांची नियुक्ती पत्रा द्वारे नियुक्ती देऊन निवड करण्यात आली .

असून गेल्या २ वर्षा पासून अनिल पाटील धमने हे शिवसेना पक्ष वाढीसाठी सक्रिय सहभाग घेऊन शिवसेना ओबीसी व्हिजे एनटी नांदेड जिल्हाप्रमुख व महाराष्ट्र राज्य निवड समिती च्या माध्यमातुन शिवसेना पक्षाची ताकद वाढवण्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात शिवसेना जिल्हाप्रमुख यांच्या निवडी असतील किवा ओबीसी विभागातील प्रत्येक कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेणे व महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयातील ओबीसी संघटन मजबुत करण्याचे काम सातत्य पुर्ण करीत आहेत त्या मुळे त्यांनी शिवसेना पक्षात आजवर केलेल्या उल्लेखनिय कार्याची दखल घेऊन त्यांची महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख पदी निवड करण्यात आली आहे . अनिल पाटील धमने हे गेल्या २८ वर्षा पासून राजकिय . सामाजिक . पत्रकारीता क्षेत्रात एक वजनदार व्यक्ती म्हणुन परिचित असून त्यांचे शिवसेना ओबीसी विभाग महाराष्ट्र राज्या मध्ये प्रत्येक जिल्ह्यात चांगली पकड असल्याचे दिसून येते त्यामुळे त्यांचे कार्य कौशल्य बघुन त्यांना पक्षाचे संघटन वाढवण्यासाठी मोठी जबाबदार देण्यात आली असून त्यांना नियुक्ती पत्र प्रदेशाध्यक्ष ॲड . डॉ पी बी कुंभार यांच्या सही निशी देण्यात आले असून या नियुक्ती पत्रावर वंदनीय हिंदू हृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा आपण सक्रियपणे प्रचार प्रसार कराल व तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्व घटकांना सोबत घेऊन संघटन वाढवून कार्य कराल असा विश्वास व्यक्त करूण आपणास पुढील कार्यास शुभेच्छा देतेत असा उल्लेख नियुक्ती पत्रात केलेला आहे या निवडी बद्दल शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे महाराष्ट्र राज्य सोशल मिडिया प्रमुख संजय कुसळकर . पालघर जिल्हाप्रमुख सचिन धायगुडे . नवी मुंबई जिल्हाप्रमुख अनिल राठोड . यवतमाळ जिल्हाप्रमुख ॲड किशोर राठोड . धाराशिव जिल्हाप्रमुख कमलाकर दाणे . सोलापुर जिल्हाप्रमुख सुयश कर्चे . परभणी जिल्हाप्रमुख मदन रेणगडे .हिंगोली जिल्हाप्रमुख बंटी राठोड . गडचिरोली जिल्हाप्रमुख पुंडलीक येवले . पुणे जिल्हा प्रमुख विजय जाधव . नांदेड जिल्हा प्रमुख राजकुमार श्रीरामवार. शंकर नांदेडकर . संतोष बारसे .संजय सोनकांबळे .हर्षराज सोनवणे . लोभाजी गवारे . सोम भारती महाराज .बालाजी आचमे . विजय पांचाळ .गणेश जिंदम. राजू कन्हाळे . यांच्या सह महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील ओबीसी जिल्हाप्रमुख यांनी व सामाजिक राजकिय क्षेत्रासह अनेक मित्र मंडळीनी त्यांच्यावर शुभेच्छा चा वर्षाव केला जात आहे.

# एमआयटी एडीटी विद्यापीठात 'एक पेड़ माँ के नाम' मोहिम

पुणे : (स. गांवकरी)



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी (एडीटी) विद्यापीठात 'एक पेड़ माँ के नाम' या केंद्र सरकारच्या राष्ट्रीय मोहिमेअंतर्गत ३०० हून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली. विद्यापीठाचा विद्यार्थी कल्याण विभाग आणि महाराष्ट्र अकॅडमी ऑफ नेव्हल एज्युकेशन अँड ट्रेनिंग (मॅनेट) यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यापीठाचे प्र-कुलपती व कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड आणि कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड यांच्या प्रेरणेने तसेच कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस. यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या मोहिमेत मॅनेटच्या ३०० कॅडेट्सनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कांचन, बहावा, गुलमोहर आणि पाम (ताड) यांसह विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड विद्यापीठ परिसरात करण्यात आली. या प्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. नचिकेत ठाकूर, विद्यार्थी कल्याण संचालक प्रा. डॉ. सूराज भोयर, मॅनेटचे प्राचार्य कॅप्टन प्रेरित मिश्रा, परीक्षा नियंत्रक डॉ. ज्ञानदेव नीलवर्ण, एमआयटी स्कूल ऑफ ड्रामाचे प्राचार्य डॉ. अमोल देशमुख, सुरक्षा व दक्षता संचालक कर्नल प्रशांत वाघमारे, उपकुलसचिव डॉ. हनुमंत पवार, सहाय्यक संचालक डॉ. प्रतिभा जगताप यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विद्यापीठाच्या शैक्षणिक उत्कृष्टतेच्या दशकपूर्ती वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात वृक्षारोपणाबरोबरच पर्यावरण जनजागृतीलाही प्राधान्य देण्यात आले.

# खिरविरे ग्रामपंचायतीच्या कारभारावर ग्रामस्थांचे गंभीर आरोप

- चौकशीची मागणी!

अकोले : (स. गांवकरी)





खिरविरे ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक व ठेकेदार यांच्या संगनमताने विकासकामांमध्ये भोंगळ कारभार सुरू असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विविध अपूर्ण व निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून सर्व कामांची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, खिरविरे प्राथमिक आरोग्य केंद्राकडे जाणारा रस्ता अद्याप अर्धवट अवस्थेत असून रस्त्याच्या साईड पट्ट्या भरलेल्या नाहीत. तसेच कामात फुटलेल्या मोऱ्यांचा वापर करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. रस्त्याच्या कामासाठी शेतकऱ्यांच्या शेतातून पर्यायी मार्ग काढण्यात आला होता, मात्र त्यानंतर त्या जागेची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. दलित वस्ती स्मशानभूमीच्या कामाला मंजुरी मिळून तीन वर्षे उलटली तरी प्रत्यक्ष काम सुरू झाले नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. आरोग्य केंद्राच्या रस्त्यावर पथदिव्यांची व्यवस्था नसल्याने नागरिकांना अंधारात प्रवास करावा लागत आहे. तसेच गवळीबाबा वस्तीला स्वातंत्र्यानंतरही रस्त्याची सुविधा उपलब्ध नसल्याचा आरोप करण्यात आला. याशिवाय पेसा निधीचा गैरवापर झाल्याचा आरोप करत आरोग्य केंद्राला वेळेवर शुद्ध पाणी मिळत नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. आवश्यक सुविधा नसल्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिरे बंद पडली असून त्यामुळे तब्बल २७ गावांतील नागरिकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आणण्यात आले. सदर प्रकरणातील सर्व विकासकामांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. यावेळी प्रकाश पराड, त्र्यंबक पराड, काभू पराड, राहुल पराड, किसन बेनके, पंढरी बेनके, राजू आवारी, कुंडलिक उघडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच गणपत डगळे, उपसरपंच सुभाष बेनके व ग्रामसेवक आंबेकर यांच्याविरोधात ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पिकअप व दुचाकीच्या धडकेत एकाचा मृत्यू

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील करंजाळे गावाजवळ कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर रविवार (दि. ७ जून) रोजी सकाळी हॉटेल छत्रपतीसमोरील धोकादायक वळणावर पिकअप वाहन आणि दुचाकी यांच्यात झालेल्या जोरदार धडक झाली असून त्यामध्ये एका युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. पिकअप (क्रमांक एमएच १४ केए ४२७७) चालकाचा ताबा सुटल्याने वाहन भरधाव वेगाने समोरून येणाऱ्या दुचाकीला (क्रमांक एमएच १४ ईजे ७८६३) धडकले. धडक इतकी जोरात होती की दुचाकीस्वार सुमारे ५० फूट अंतरापर्यंत फरफटत गेला. तर अपघातानंतर पिकअप वाहनही पलटी झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या दुर्घटनेत रामदास दशरथ घोगरे (वय ४०, रा. खानगाव, ता. जुन्नर, जि. पुणे) यांचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. जखमी अवस्थेत असलेल्या घोगरे यांना रुग्णवाहिकेद्वारे जुन्नर येथील रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी दोन्ही वाहने ताब्यात घेत पंचनामा केला. दरम्यान, करंजाळे परिसरातील या धोकादायक वळणावर वारंवार अपघात होत असल्याने स्थानिक नागरिकांनी तातडीने सुरक्षेविषयी आवश्यक उपाययोजना कराव्यात अशी मागणी केली आहे.



### हवामानाचा बाजरी पिकाला फटका; उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट.

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील उन्हाळी बाजरीचा हंगाम सध्या अंतिम टप्प्यात आला असून, यंदा पीक चांगले असताना देखील हवामान बदलामुळे उत्पादनात घट झाली आहे. हंगामाच्या अखेरीस झालेल्या अवकाळी पावसाने दोन ते तीन वेळा जोरदार हजेरी लावल्याने पिकांचे नुकसान झाले. अनेक ठिकाणी बाजरी आडवी पडणे व फुलोरा खराब होणे तसेच तीव्र उन्हामुळे बाजरीच्या फुलोऱ्याचा गळ होणे तसेच कणसे पूर्ण न भरणे अशा समस्यांचा मोठा परिणाम उत्पादनावर झाला. त्यामुळे शेतकरी वर्ग अडचणीत आला आहे. उन्हाळी बाजरीला निसर्गाचा तडाखा बसल्याने शेतकऱ्यांची आर्थिक गणिते बिघडली. यावर्षी ऊसतोडणी लवकर पूर्ण झाल्यामुळे शेतकऱ्यांनी ऊसाच्या शेतात रोटर मारून मोठ्या प्रमाणात उन्हाळी बाजरीची पेरणी केली होती. त्यामुळे यावर्षी पेरणीचे क्षेत्र वाढले होते. सध्या शेतकरी वर्ग पीक वाचवण्यासाठी प्रयत्नशील असून, कापणी व कुडणीची कामे वेगात सुरू आहेत. येत्या सात ते आठ दिवसांत हंगाम पूर्णपणे संपण्याची शक्यता आहे. बाजरी उत्पादनात आदिवासी समाजाचा मोलाचा वाटा असून, निम्मा किंवा तृतीयांश वाट्याने ते शेतकऱ्यांना मदत करतात. दरम्यान, बाजारात बाजरीला सध्या २५ ते ३५ रुपये प्रति किलो दर मिळत असून, वैरणीचे दर ३०० ते ६०० रुपये प्रति शेकडा आहेत. मात्र वाढलेले उत्पादन खर्च, डिझेलचे दर आणि मळणी यंत्रांच्या वाढत्या भाड्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती अपेक्षित नफा राहत नसल्याची खंत शेतकरी वर्गाकडून व्यक्त होत आहे.

### बावी येथे वादळी वाऱ्याचा कहर, तीन गायींचा मृत्यू , फळबागांचे नुकसान

जामखेड (स. गांवकरी) : जामखेड तालुक्यातील बावी गाव व परिसरात शुक्रवारी दुपारी आलेल्या वादळी वारा व अवकाळी पावसाने मोठे नुकसान केले आहे. वादळामुळे लाईटचा करंट गायीच्या शेडमध्ये उतरला यात तीन गायी जागीच मृत्यूमुखी पडल्या तर मालक थोडक्यात बचावले त्यांनाही जोरदार करंट बसला शेकडो झाडे उन्मळून पडल्याने लिंबोणीच्या फळबागा उद्ध्वस्त झाल्या आहेत. तालुक्यातील बावी येथील पवन जाधव यांच्या शेडमध्ये वादळामुळे वीजेचा करंट उतरला यात तीन गायी मृत्यूमुखी पडल्या तसेच पवन जाधव यांना जोरदार वीजेचा करंट बसला तेही चक्कर येऊन पडले तोंडातून रक्त आले. शेजारच्या लोकांनी त्यांना ताबडतोब दवाखान्यात दाखल केले. सध्या त्यांची तब्येत धोक्याबाहेर आहे धोका टळला आहे. तसेच वादळामुळे परिसरातील लिंबोणीच्या बागेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे झाडे उन्मळून पडले आहेत. सचिन मुरूमकर, बयाजी पवार, दत्ता कारंडे, अभिमान पवार, मधुकर पवार यांच्या बागेचे नुकसान झाले आहे. शेतकरी सचिन मुरूमकर म्हणाले, "१० वर्षे मेहनत करून लिंबोणीची बाग उभी केली. १० मिनिटांच्या वादळात सगळी झाडे उन्मळून पडली. लाखो रुपयांचे कर्ज कसे फेडणार?" पुढील २ दिवस अहिल्यानगर जिल्ह्याला वादळी वारा व विजांसह पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी फळबागांना आधार द्यावा, काढणीला आलेला शेतमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

### धामोरी येथील व्यायाम शाळाचे ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते लोकार्पण

नेवासा (स. गांवकरी) : नेवासा तालुक्यातील मौजे धामोरी येथे नेवासा तालुक्याचे लोकप्रिय आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून तरुण युवा वर्गाच्या मागणीने भरभक्कम व्यायाम शाळेचे साहित्य, फिट करून आज त्याचा लोकार्पण सोहळा ग्रामस्थांच्या व ज्येष्ठ नागरिक युवा वर्गाच्या उपस्थितीत संपन्न झाला. धामोरी गावचे ज्येष्ठ भजनी मंडळाचे अध्यक्ष ज्ञानदेव रामचंद्र पटारे यांच्या शुभहस्ते नारळ फोडून व्यायाम शाळा चे लोकार्पण व उद्घाटन सोहळा संपन्न झाला त्याप्रसंगी युवा कार्यकर्ते आदिनाथ पटारे , बहिरवाडी सोसायटीचे चेअरमन नवनाथ पाटील पटारे, जगन्नाथ महाराज पटारे,युवा नेतृत्व राम पटारे,रमेश ठोकळ,संदीप पटारे,अविनाश दाणे ,सोमनाथ ठोकळ,सागर दाणे,युवराज गायकवाड,महेश आडगळे, अनिल आढागळे, माधव पटारे, अश्विन पटारे,शुभम पटारे,ओम घोरपडे,भारत पटारे,विठ्ठल दाणे,आदी ग्रामस्थ व युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

WANTED EX-SERVICEMEN
At Dhoki Toll Plaza
Ahilyanagar Section NH-222
(New NH-61)
K.M. 161.212 To K.M. 210.527
Contractor: MD Yousuf Ali
Send your resumes to:
dhokifeeplaza@gmail.com

# येरवडा कारागृह परिसरात 11 हजार वृक्षांची लागवड

पुणे : (स. गांवकरी)



जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने कारागृह विभाग आणि रोटरी क्लब ऑफ पुणे टिळक रोड यांच्या संयुक्त विद्यमाने येरवडा कारागृह परिसरात ११ हजार वृक्षांची लागवड करून घनदाट नागरी वन (डेन्स अर्बन फॉरेस्ट) निर्माण करण्याच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमास आज प्रारंभ करण्यात आला.

यावेळी उपक्रमासाठी राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक तथा कारागृह विभागाचे वरिष्ठ अधिकारी डॉ. सुहास वारके (आयपीएस), म्युनिशन्स इंडिया लिमिटेडच्या मानव संसाधन विभागाचे संचालक नंदकिशोर नाईक, रोटरी प्रांत ३१३१ चे प्रांतपाल संतोष मराठे, रोटरी क्लब ऑफ पुणे टिळक रोडचे अध्यक्ष रोटेरियन देवदत्त हंबर्डीकर आणि सभासद, येरवडा कारागृह प्रशासनाचे अधिकारी शामकांत शेडगे, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१चे संचालक पर्यावरण राजेंद्रकुमार सराफ आदी उपस्थित होते. वाढते शहरीकरण, प्रदूषण आणि हवामान बदलाच्या आव्हानांवर मात करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ पुणे टिळक रोड यांच्या पुढाकाराने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. येरवडा खुल्या कारागृहाच्या परिसरातील एक एकर जागेवर हा घनदाट नागरी वन निर्माण करण्याचा प्रकल्प राबविण्यात येत असून, या माध्यमातून पर्यावरण संवर्धना बरोबरच शहरातील हरित क्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. घनदाट जंगले म्हणजे अशी ठिकाणे, जिथे झाडे एकमेकांच्या इतकी जवळ असतात की जमिनी पर्यंत सूर्य प्रकाश पोहोचणे कठीण होते. ही जंगले पृथ्वीची फुफ्फुसे मानली जातात आणि येथे अनेक दुर्मिळ वनस्पती व वन्यजीव राहतात.

शहरी घनदाट जंगले ही शहराची फुफ्फुसे आहेत. घनदाट नागरी वनामुळे जैवविविधतेचे संवर्धन, हवेच्या गुणवत्तेत सुधारणा, कार्बन शोषण क्षमता वाढ आणि पर्यावरणीय संतुलन राखण्यास मोठी मदत होणार आहे. केवळ वृक्षलागवड करून थांबणे हा या उपक्रमाचा उद्देश नसून, लागवड केलेल्या प्रत्येक वृक्षाचे संगोपन आणि संवर्धन करण्याची जबाबदारी कारागृह प्रशासनाने स्वीकारली आहे. हा परिसर समृद्ध हरित पट्टा म्हणून विकसित होईल.




ठाणे : ठाकरे शिवसेनेच्या वतीने उपजिल्हा प्रमुख रोहिदास मुंडे व शहरप्रमुख सचिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली दिवा-मुंबई लोकल सुरु करण्यासाठी स्वाक्षरी मोहिम राबविण्यात आली. दिवा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल लोकल ट्रेन सुरु करणे तसेच कल्याण ते घाटकोपर या ५ व्या आणि ६ व्या मार्गिकेवर उपनगरीय रेल्वे प्रवासी वाहतूक सुरु करणे बाबत दिवा रेल्वे स्थानकाजवळ स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली.

(फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### खैरगाव शिवारात घोटी पोलिसांची गावठी दारू अड्ड्यावर धाड

इगतपुरी (स. गांवकरी) : इगतपुरी तालुक्यातील खैरगाव शिवारात मोराच्या जंगलामध्ये मोठ्या प्रमाणात गावठी दारू बनवत असल्याची गुप्त माहिती घोटीचे पोलीस निरीक्षक विजय शिंदे यांना मिळाली होती. ही माहिती समजताच पोलीस निरीक्षक विजय शिंदे यांनी पोलीस पथकासह या जंगलात पोलीस पथक त्या ठिकाणी पोहचले असता पोलिसांची चाहुल लागताच दारु बनवणाऱ्या इसमांनी जंगलात धुम ठोकली. पोलीसांनी या ठिकाणी डोंगराच्या पायथ्याशी छापा टाकुन गावठी दारूसाठी लागणारे १ लाख ३० हजार रुपये किमतीचे गुळ व नवसागर रसायन मिस्त्रीत पाणीजागेवरच नष्ट केले. खैरगाव येथील मोराच्या डोंगरात मोठ्या प्रमाणावर गावठी दारू बनवली जाते. वन विभागाच्या हद्दीत मोठे जंगल असुन पोलिसांची चाहुल लागताच दारू बनवणारे इसम थेट जंगलात पळून जातात. दारू बनवणाऱ्या अज्ञात आरोपींचा पोलीस शोध घेत असुन या कारवाईत पहिल्या छाप्यात गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे १ लाख ३० हजार रुपये किंमतीचे रसायन मुद्देमाल जागेवरच नष्ट केला. तसेच ६ हजार पाचशे रुपये किमतीचे प्लॅस्टिकचे १३ ड्रम, १३ हजार रुपये किंमतीचे १३ लोखंडी ड्रम, २ हजार रुपये किंमतीचे लाकुड, ३ हजार पाचशे रुपये किमतीची सफेद ड्रममधील तयार गावठी दारू अशी १ लाख ५५ हजार रुपये किंमतीचा बिनापरवाना बेकायदेशीर मुद्देमाल जप्त करून नष्ट केला.या कारवाई गावठी दारू बनवणारा संशयित आरोपी वामन कोंडाजी आघाण, रा. खैरगाव याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस निरीक्षक विजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रविण उदे, पोलीस हवालदार लक्ष्मण धकाते, परीक्षीत इंगळे, चव्हाण, सतिष चव्हाण, नितीन कटारे यांनी केली. कारवाई दरम्यान पोलीसांची चाहुल लागताच आरोपी पळून गेले. या कारवाईमुळे गावठी दारू बनवणारे यांचे धाबे दणाणले आहे.

### प्रतिलिपी अधिकार अधिनियम अंतर्गत खेड पोलिसांची मोठी कारवाई

राजगुरुनगर (स. गांवकरी) : कॉपीराईट कायद्याचे उल्लंघन करून बनावट व अनधिकृत वस्तूंची विक्री करणाऱ्यांविरोधात खेड पोलिसांनी राजगुरुनगर शहरात मोठी कारवाई केली. या कारवाईत मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पाच व्यावसायिकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याबाबत पुमा सी कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी महेंद्र सोहन सिंग देवरा, वय 36 रा. बिरोलिया, राजस्थान यांनी खेड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शहरातील वाडारोड परिसरातील रेडीमेड कपडे ,तसेच चप्पल, बुटाच्या दुकानात प्रसिद्ध कंपन्यांचे ,कॉपीराइट,विना परवाना विक्री होत असल्याची तक्रारीवरून गुरुवार दिनांक ४ रोजी संध्याकाळी वाडा रोड येथील उमेश ट्रेडींग कंपनीचे होलसेल क्लॉथ सेंटर, साई आर्केड येथील पवार फुटवेअर हब, रॉयल होलसेल हब, सेंट्रल मेन्स हब, पहिल्या मजल्यावर असलेले होलसेल हब या व्यावसायिक दुकानावर छापे टाकण्यात आले.या दरम्यान संबंधित दुकानातून पुमा या प्रसिद्ध कंपनीचा विक्री करण्याचा परवाना नसताना हुबेहूब व्यापारचिंह,लोगो,आकार,अक्षर असणारे बनावट टि शर्ट, ट्रॅक पॅन्ट, जॅकेट, शुज, चप्पल विक्री करीत असल्याचे आढळून आले.याप्रकरणी उमेश संभाजी सातपुते,सुनील रघुनाथ पवार, आजाद रशीद मोमीन,फैजल अब्दुलगफ्फार शेख, युवान आसिफ मोमीन,सर्व राहणार राजगुरुनगर,या व्यावसायिकावर प्रतिलिपी अधिकार अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून,दुकानातील कॉपीराइट केलेला एकूण सात लाख ३८ हजार ८८६ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. हि कारवाई खेड पोलिस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक महेश गरड यांच्या नेतृत्वाखाली पोलिस अंमलदार प्रवीण आढारी,महेश गोसावी,सुरज राक्षे,महिला पोलिस मिथिला मोरे यांच्या पथकाने केली. राजगुरुनगर शहरातील अनधिकृत व बनावट वस्तू विक्री प्रकरणी प्रथमच झालेल्या मोठ्या कारवाईमुळे व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहे.

### जामखेड उपनगराध्यक्षांचे नगरसेवक पद धोक्यात? निर्णय राखीव

जामखेड तालुका (स. गांवकरी) : जामखेड नगरपरिषद निवडणुकीतील वॉर्ड क्र. ३ मधील ओबीसी प्रवर्गातून निवडून आलेले उपनगराध्यक्ष यांच्या जातप्रमाणपत्राच्या वैधतेची कायदेशीर लढाई आता अंतिम टप्प्यात आली आहे. या प्रकरणी सदर प्रभागातील पराभूत उमेदवार ऋषिकेश विष्णू खरात यांनी दाखल केलेल्या तक्रारीवर अहिल्यानगर येथील जातपडताळणी समितीसमोर अंतिम युक्तिवाद पूर्ण झाला असून, समितीने हा निर्णय राखीव ठेवला आहे. त्यामुळे उपनगराध्यक्षांचे नगरसेवकपद राहणार की जाणार, याची उत्सुकता जामखेडवासियांमध्ये निर्माण झाली आहे. जामखेड नगरपरिषद निवडणुकीत वॉर्ड क्र. ३ मधून ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढवून उपनगराध्यक्ष विजयी झाले होते. मात्र, त्यांनी निवडणूक लढवताना सादर केलेले जातप्रमाणपत्र चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे मिळवल्याचा गंभीर आरोप करत पराभूत उमेदवार ऋषिकेश खरात यांनी २९ जानेवारी २०२६ रोजी जातपडताळणी समिती व जिल्हाधिकाऱ्यांकडे याविरोधात अधिकृत तक्रार दाखल केली होती.

# वाद मिटला : जुनी भेंडी ते काळा खडक बंद रस्ता अखेर खुला

## कळवण तहसीलदार वारुळे साहेब यांच्या पुढाकाराने सामंजस्याचा मार्ग

कळवण, नाशिक (स. गांवकरी)




कळवण तालुक्यातील मौजे जुनी भेंडी ते काळा खडक या मार्गावरील गेल्या तब्बल दहा वर्षांपासून बंद असलेला वहिवाट रस्ता अखेर पुन्हा खुला करण्यात आला असून,

या महत्त्वाच्या प्रश्नावर कळवणचे तहसीलदार रोहिदास वारुळे साहेब यांनी वादमुक्त संवाद घडवून आणत सामंजस्याचा आदर्श निर्माण केला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेल्या या रस्त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. शेतीच्या कामांसाठी ये-जा, माल वाहतूक, जनावरे ने-आण तसेच दैनंदिन कामकाजात शेतकऱ्यांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत असल्याने आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत होता. अनेकदा हा प्रश्न तणावाचे कारण बनण्याची शक्यता होती; मात्र प्रशासनाच्या संयमी भूमिकेमुळे हा विषय शांततेत मार्गी लागला.

कळवणचे तहसीलदार वारुळे साहेब यांनी संबंधित शेतकरी, स्थानिक नागरिक व महसूल प्रशासन यांच्यात प्रत्यक्ष संवाद साधून गैरसमज दूर करण्याचे काम केले. “वादाऐवजी संवाद” या भूमिकेतून सर्व पक्षांना एकत्र आणत कुठलाही संघर्ष किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण न होता बंद असलेली वहिवाट खुली करण्यात आली. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत प्रशासनाचे आभार मानले आहेत.

यावेळी भेंडी गावातील शेतकरी व शेतकरी नेते विलास रौंदळ, गावचे पोलीस पाटील, ग्राम महसूल अधिकारी राजेंद्र गरुड, महसूल अधिकारी अविनाश पवार, महसूल सहाय्यक शरद अहिरे तसेच परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

स्थानिक शेतकऱ्यांच्या मते, “गेल्या दहा वर्षांपासून रखडलेला प्रश्न कोणताही वाद न होता सुटणे ही मोठी दिलासादायक बाब आहे. प्रशासनाने संवेदनशीलतेने घेतलेल्या भूमिकेमुळे अनेक कुटुंबांची अडचण दूर झाली.” ग्रामीण भागातील जमीन, वहिवाट व शेती रस्त्यांवरील वाद अनेकदा न्यायालयीन पातळीपर्यंत पोहोचतात. अशा परिस्थितीत कळवण प्रशासनाने संवाद आणि सामंजस्यातून मार्ग काढत एक सकारात्मक उदाहरण उभे केले आहे. आता हा रस्ता खुला झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांचा शेतीचा प्रवास अधिक सोपा होणार असून, विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# रणजित यादव यांची आकस्मिक उपस्थिती तपासणी

ठाणे : (स. गांवकरी)



- गैरहजर अधिकारी-कर्मचाऱ्यांना नोटीस बजावण्याचे निर्देश
- कार्यालयीन शिस्तीबाबत प्रशासन गंभीर

जिल्हा परिषद प्रशासनातील कार्यालयीन शिस्त, जबाबदारी आणि कार्यक्षमता अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी आज, दि. ०५ जून, २०२६ रोजी जिल्हा परिषद ठाणे मुख्यालयात आकस्मिक भेट देऊन विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीची तपासणी केली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विविध विभागांतील हजेरी पत्रकांची पाहणी करून प्रत्यक्ष उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांची पडताळणी केली. कार्यालयीन वेळेत अनुपस्थित अथवा विनापरवानगी गैरहजर असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची स्वतंत्र नोंद घेण्यात आली असून संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पाहणीदरम्यान विविध विभागांतील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. नागरिकांकडून येणाऱ्या अर्ज, तक्रारी व प्रकरणांचा निपटारा वेळेत होणे, कार्यालयीन कामकाजात अनावश्यक विलंब टाळणे तसेच प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपल्या जबाबदाऱ्यांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले.

# ओतूरला वारकरी साहित्य परिषदेचा मेळावा संपन्न

ओतूर : (स. गांवकरी)



जुन्नर तालुका वारकरी साहित्य परिषदेचा मेळावा मंगळवारी(दि.३) ओतूर (ता.जुन्नर) येथे वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष ह.भ.प गंगाराम महाराज डुंबरे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. याप्रसंगी पुणे जिल्हा वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष हरिभक्त परायण भाऊसाहेब महाराज हांडे,अनंतराव गटकळ,दत्ता वाघ, प्रकाश नवले,तानाजी खराडे,शिवाजी बोडके, बाळासाहेब नवले, हरिभाऊ देवकर,अरूणजी कुऱ्हाडे,भरत तांबे आदी मान्यवर व बहुसंख्य वारकरी उपस्थित होते.पुणे जिल्हा वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष ह.भ.प.भाऊसाहेब महाराज हांडे यांनी आपल्या मनोगतातून परिषदेचा पुणे जिल्ह्याचा आढावा सांगितला आणि त्यामध्ये जुन्नर तालुका कसा अग्रेसर आहे हे देखील नमूद केले.जुन्नर तालुका वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष आणि या मेळाव्याचे अध्यक्ष ह.भ.प.गंगाराम महाराज डुंबरे यांनी आपले अध्यक्षीय मनोगतातून विचार व्यक्त करताना सांगितले कि, ११ नोव्हेंबर २०११ साली जुन्नर तालुका वारकरी साहित्य परिषदेची स्थापना झाली. वारकऱ्यांच्या अनेक प्रश्नांचे,समस्यांचे निराकरण करण्याचे काम साहित्य परिषदेने केले.अनेक वारकऱ्यांना मानधन देखील मिळवून दिले. भागवत धर्माचा प्रचार आणि प्रसार करताना शालेय स्तरावरून प्रवचन, गावोगावी स्वच्छता अभियान,सरकार दरबारी वारकऱ्यांचे अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी आज पर्यंत साहित्य परिषदेने काम केले आहे. आता काही वारकऱ्यांना पाच हजार रूपयांचे मानधन मिळत आहे.राज्याचे नेतृत्व करणारे विठ्ठलराव पाटील हे साहित्य परिषदेला एक सक्षम नेतृत्व मिळालेल आहे.स्व.अशोक महाराज काळे यांनी साहित्य परिषदेचे पुणे जिल्ह्याचे अध्यक्ष पद भूषवताना जुन्नर तालुक्याची जबाबदारी माझ्यावरती सोपवली. जवळपास पंधरा वर्षे मी हे काम पाहत आहे. या माध्यमातून वारकऱ्यांचे संघटन आपण यशस्वीपणे केलेल आहे.

# पोलवर चढून शेतकऱ्याचे आंदोलन

पारनेर : (स. गांवकरी)



- स्वतंत्र फिडरच्या लेखी आश्वासनानंतर शेतकऱ्यांचे आंदोलन स्थगित
- वनकुटे परिसरातील वीज प्रश्नावर शेतकऱ्यांचा आक्रमक पवित्रा

वनकुटे व परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या कमी दाबाच्या व वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याविरोधात गुरुवारी खडकवाडी येथील महावितरण कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन केले. वीजेअभावी शेतीपिकांचे मोठे नुकसान होत असल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी महावितरणविरोधात जोरदार घोषणाबाजी करत तीव्र आंदोलन छेडले.

आंदोलनादरम्यान टोमॅटो पीक जळाल्याने व्यथित झालेल्या राजेंद्र इरोळे या शेतकऱ्याने वीजेच्या पोलवर चढून आंदोलन करण्याचा प्रयत्न केल्याने काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. अखेर वनकुटेसाठी स्वतंत्र फिडर देण्याचे लेखी आश्वासन महावितरणकडून मिळाल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

वनकुटे व परिसरातील शेतकऱ्यांनी सांगितले की, गेल्या पंधरा दिवसांपासून परिसरात अत्यंत कमी दाबाने वीजपुरवठा होत असून दर काही मिनिटांनी वीज खंडित होत आहे. त्यामुळे कृषी पंप बंद पडत असून पिकांना वेळेवर पाणी मिळत नसल्याने टोमॅटो, भाजीपाला व अन्य नगदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रश्न सुटत नसल्याने अखेर शेतकऱ्यांनी एकत्र येत खडकवाडी वीज केंद्रावर ठिय्या आंदोलन सुरू केले. आंदोलनादरम्यान राजेंद्र इरोळे यांनी त्यांच्या शेतातील टोमॅटो पीक जळाल्याची व्यथा मांडत संतापाच्या भरात वीजेच्या पोलवर चढून निषेध नोंदविण्याचा प्रयत्न केला. मात्र उपस्थित शेतकरी व ग्रामस्थांनी त्यांची समजूत काढत त्यांना खाली उतरवले. त्यामुळे संभाव्य अनर्थ टळला. यावेळी आंदोलकांनी महावितरणच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. वीजपुरवठ्याबाबत विचारणा केली असता केवळ "बिघाड झाला आहे" असे सांगितले जाते; मात्र तो दुरुस्त करण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या जात नाहीत, असा आरोप करण्यात आला. शेतकऱ्यांना वेळेवर बिले भरण्याची अपेक्षा करणाऱ्या महावितरणने दर्जेदार वीजपुरवठा करण्याची जबाबदारीही पार पाडावी, अशी मागणी करण्यात आली.

माजी सरपंच ॲड. राहुल झावरे यांनी आंदोलनात सहभागी होत शेतकऱ्यांच्या मागण्यांचे समर्थन केले. त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून वनकुटेतील वीज समस्येबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. गारपीट व अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्यानंतर वीज यंत्रणा सक्षम करण्यासाठी मिळालेल्या निधीचा योग्य वापर झाला का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. आंदोलनाची तीव्रता वाढत असताना महावितरणच्या अधिकाऱ्यांनी आंदोलकांशी चर्चा केली. यावेळी वनकुटे गावासाठी स्वतंत्र फिडर उभारण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल तसेच त्यासंदर्भात लेखी आश्वासन देण्यात आले. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. या आंदोलनात ॲड. राहुल झावरे, दीपक गुंजाळ, शिवाजी बरकडे, पांडुरंग बेलकर, राजेंद्र इरोळे, अनिल काकडे, राहुल गुंजाळ, चिवा औटी, तात्या मुसळे, शरद आग्रे, सोमनाथ मुसळे, राजू डहाळे, देविदास वाबळे, सनी इरोळे, किरण शिंदे, चेतन गुंजाळ, संकेत वाळुंज, संकेत शिंदे, राजेंद्र शिंदे, अनिल शिंदे, किरण शिंगटे, पवन इरोळे, अजित गुंजाळ, सतीश वाबळे, संदीप इरोळे, संदीप शिंदे, भिवा बरकडे, अजित वाळुंज, नितीन गुंजाळ, विजय वाबळे, नवनाथ शिंदे, संतोष डोके, आकाश झावरे, दादा वाळुंज यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. अधिकाऱ्यांनी दिलेल्या लेखी हमीनंतर शेतकऱ्यांनी आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेतला. मात्र दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी वेळेत झाली नाही तर भविष्यात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

# टाकळी ढोकेश्वर गटात सुमारे ४५० ज्येष्ठ नागरिकांचा अनोखा सन्मान!

## रविंद्रशेठ राजदेव यांच्याकडून ज्येष्ठांना फेटा बांधून वाढदिवसाच्या अनोख्या शुभेच्छा

टाकळी ढोकेश्वर : (स. गांवकरी)




अहिल्यानगर जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार आणि लोकनेते डॉ. निलेशजी लंके साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाच्या नेत्या सौ. सोनियाताई राजदेव यांच्या माध्यमातून टाकळी ढोकेश्वर गटात एक अत्यंत स्तुत्य आणि भव्य सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. १ जून या तारखेचे औचित्य साधून या गटातील सुमारे ४५० ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात आणि सन्मानपूर्वक साजरा करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे टाकळी ढोकेश्वर गटाचे नेते रविंद्रशेठ राजदेव यांनी स्वतः गावोगावी जाऊन या ज्येष्ठांना मानाचा फेटा बांधून त्यांच्याप्रती आपला आदरभाव व्यक्त केला.

ग्रामीण भागात पूर्वीच्या काळी जन्मनोंदीची अचूक सोय नसल्याने अनेक ज्येष्ठ नागरिकांची जन्मतारीख कागदोपत्री '१ जून' अशीच नोंदवलेली असते. या दिवसाचे महत्त्व ओळखून ज्येष्ठांना त्यांच्या आयुष्यातील एक आनंदाचा आणि सन्मानाचा क्षण देण्याच्या उदात्त हेतूने या भव्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रविंद्रशेठ राजदेव यांनी टाकळी ढोकेश्वर गटातील नांदूर पठार, पिंपळगाव रोठा, गारगुंडी, कासारे, टाकळी ढोकेश्वर, वासुंदे, काकणेवाडी, खडकवाडी, मांडवा, देसावडे, पोखरी, काटाळवेढा

या सर्व गावांमध्ये प्रत्यक्ष जाऊन त्यांनी ज्येष्ठ नागरिकांची भेट घेतली. या संपूर्ण मोहिमेत गटातील सुमारे ४५० ज्येष्ठ नागरिकांना मानाचा फेटा बांधून, प्रेमाने विचारपूस करत त्यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. आपल्या वाढदिवसानिमित्त असा अनपेक्षित आणि मानाचा सत्कार झाल्यामुळे अनेक ज्येष्ठांचे डोळे आनंदाने पाणावले होते. तरुण पिढीकडून मिळणारा हा सन्मान आणि कृतज्ञता पाहून त्यांच्या चेहऱ्यावरील समाधान आयोजकांसाठी खूप मोठी पावती ठरली.

खासदार डॉ. निलेश लंके यांच्या जनसामान्यांशी नाळ जोडलेल्या कार्यपद्धतीचा वसा सौ. सोनियाताई राजदेव आणि रविंद्रशेठ राजदेव अत्यंत समर्थपणे पुढे चालवत आहेत, हेच या उपक्रमातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. केवळ राजकारण न करता त्यापलीकडे जाऊन समाजकारण, माणुसकी आणि ज्येष्ठांचा आदर या मूल्यांची जोपासना करण्याच्या या उपक्रमाचे संपूर्ण टाकळी ढोकेश्वर गटात आणि पारनेर तालुक्यात सर्वत्र भरभरून कौतुक होत आहे. या अभिनव उपक्रमामुळे सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)